# व्यवस्थेला प्रश्न विचारणारा ‘वन्या’

पुणे, दि. १६ जानेवारी २०२६ : “मी इथून जाणार नाही,” एका आदिवासी महिलेने सरकारी आदेशाला दिलेलं हे साधं पण ठाम उत्तर दिग्दर्शक सचिन श्रीवास्तव यांच्या मनात खोलवर रुजलं आणि त्यातून ‘वन्या’ या कन्नड चित्रपटाची निर्मिती झाली. आदिवासीं, जंगल, विकास आणि माणसाच्या अस्तित्वातील संघर्ष मांडणारा ‘वन्या’ हा चित्रपट पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात आज दाखवण्यात आला.

सचिन श्रीवास्तव म्हणाले, “जर निसर्गच नष्ट झाला, तर उरणार तरी काय?” हा प्रश्न मला पडला आणि त्याचवेळी आदिवासींच्या जीवनाचा संघर्ष दिसत होता. जे आदिवासी जंगल पिढ्यानपिढ्या जपतात, तेच आदिवासी अतिक्रमण करणारे ठरवले जातात, ही विसंगती समोर आली आणि त्यातून या चित्रपटाची निर्मिती झाली.”

या चित्रपटात टायगर रिझर्व्ह, संरक्षण कायदे, विकास, पुनर्वसन आणि पिढ्यांचा संघर्ष या चित्रपटात मांडण्यात आला आहे. या चित्रपटाचे चित्रीकरण कर्नाटकातील नागरहोल टायगर रिझर्व्ह परिसरात करण्यात आले आहे. घनदाट जंगल, निसर्गाचा निखळ शांतपणा आणि माणूस-निसर्ग यांच्यातील ताणतणाव हे सगळं या चित्रपटाला पुढे नेतं.

**प्रेमाचं रूपक ठरलेली ‘व्हाइट स्नेल’**

पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात आज बेलारशियन प्रेमकथा व्हाइट स्नेल या चित्रपटाने प्रेक्षकांचे विशेष लक्ष वेधून घेतले. चित्रपटानंतर कलाकार मिखाईल सेनकोव यांनी चित्रपटातील नातेसंबंध, प्रतीकात्मक मांडणी आणि भावनिक प्रवास याविषयी संवाद साधला.

ते म्हणाले, “‘व्हाइट स्नेल’ म्हणजे पांढरी गोगलगाय, ही दोन पूर्णपणे वेगळ्या जगातल्या व्यक्तींची कथा आहे. माशा आणि मीशा या अनुभव आणि जीवनदृष्टी भिन्न असणाऱ्या पात्रांमधील हा नात्याचा प्रवास आहे. माशा मॉडेलिंगच्या झगमगत्या विश्वात वावरणारी, तर मीशा शवकक्षात काम करणारा तंत्रज्ञ–असतानाही त्यांच्यातील ओढ हळूहळू आकार घेते. “हा चित्रपट दोन माणसांमधील नातं कसं सावकाश उलगडत जातं आणि त्या प्रक्रियेत ते स्वतःलाही कसं शोधतात, हे दाखवतो,” असे त्यांनी स्पष्ट केले.

‘व्हाइट स्नेल’ हे माशाच्या व्यक्तिमत्त्वाचं प्रतीक आहे. तिची गोरी त्वचा, पांढरे केस आणि कथेत वारंवार दिसणारी पांढरी गोगलगाय, या सगळ्यांतून तिच्या वेगळेपणाचं रूपक उभं राहतं. दोन गोगलगायी एकमेकींकडे सरकत असलेला प्रसंग प्रेमाची नाजूक, सूक्ष्म भाषा मांडतो. रशियन भाषेत ‘व्हाइट स्नेल’ हा शब्द इतरांपेक्षा वेगळ्या व्यक्तीसाठी वापरला जातो, ही बाबही त्यांनी नमूद केली. भारतातील पहिल्याच भेटीचा आनंद असल्याचे मिखाईल सेनकोव यांनी सांगितले. ते म्हणाले, “विमानतळावर उतरल्यापासून मिळालेलं स्वागत, इथली संस्कृती, निसर्ग आणि माणसं, सगळंच

अद्भुत आहे.